# नियमित दिवाणी दावा क्रमांक २३८/२०२२ मधील आदेश नि.क्र.१५

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियत व विना म्हणणे आदेश रद्दबातल होऊन त्यांची कैफियत व म्हणणे स्वीकारण्यात यावा याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादीस जुनी कागदपत्रे व महत्वाची माहिती उपलब्ध नसल्यामुळे प्रतिवादीस कैफियत व म्हणणे देणेस विलंब झाला. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द सदरचा आदेश पारीत करण्यात आला होता. कैफियत व म्हणणे स्वीकारणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण होणार आहे. तसे न झाल्यास प्रतिवादीचे केव्हाही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द पारीत झालेला विना कैफियत व विना म्हणणे आदेश रद्द करण्यात येऊन त्यांची कैफियत व म्हणणे स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, अर्ज खरा नाही, कायदेशीर नाही. प्रतिवादी याचा दावा जागेशी कोणताही हक्क, हितसंबंध नाही. तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम वादीचे बाजूने लागला आहे. प्रतिवादीने कोणती जुनी कागदपत्रे व महत्वाची माहिती उपलब्ध नव्हती याचा अर्जात उल्लेख केलेला नाही. विलंबाबाबत कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. अर्ज नामंजूर केलेस प्रतिवादीचे नुकसान होणार नाही. प्रतिवादीने तुर्तातुर्त ताकिदीच्या हुकूमाचा अवमान करुन दि.१४/८/२०२२ रोजी दावा जागेचे घरजागेचे कुलूप तोडून घरातील सामानाची चोरी करुन अनाधिकाराने दावा जागेत घुसखोरी केली. वादी हा वयोवृध्द असून त्याचा एकुलता एक मुलगा मयत झालेला आहे, तो गरीब स्वभावाचा आहे. प्रतिवादीने कोणताही कागदोपत्री पुरावा कोर्टात दाखल केलेला नसल्याने प्रतिवादीचा अर्ज रद्द होण्याची विनंती वादीने केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादीने निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स दि.५/४/२०२२ रोजी प्राप्त झाल्याचे बेलिफ अहवालावरुन दिसून येते. दि.६/४/२०२२ रोजी प्रतिवादी वकीलांमार्फत हजर झाल्याचे दिसते. त्यानंतर प्रतिवादीस दि.६/४/२०२२ व २१/४/२०२२ ला मुदती देण्यात आल्या. त्यानंतर दि.६/५/२०२२ रोजी प्रतिवादी व वकील गैरहजर असताना त्यांचा कुठलाही अर्ज आला नसल्यामुळे प्रतिवादीविरुध्द नि.क्र.१ वर विना कैफियत व नि.क्र.५ वर विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर चार तारखा उलटल्यानंतर दि.१२/१०/२०२२ रोजी प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल केला. मात्र सदर दाव्यामध्ये नैसर्गीक

न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत व म्हणणे दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी यांनी रक्कम रुपये रु.२००/- (रक्कम रुपये दोनशे) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वादीस खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2022.12.13 10:34:46 +0530

बार्शी. (एन.एस.सबनीस)

दिनांकः- १२/१२/२०२२ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Shri. N.S.Sabnis<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 12.12.2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 13.12.2022 |